कर्नाटक सरकार

# माय–मराठी

# 4

## मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक
## MARATHI FIRST LANGUAGE

### इयत्ता चौथी

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**
6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003

# Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi prepared which in turn are designed based on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 11 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS and 5$^{th}$ to 10$^{th}$ there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- Connecting knowledge to life activities.
- Learning to shift from rote methods.
- Enriching the curriculum beyond textbooks.
- Learning experiences for the construction of knowledge.
- Making examinations flexible and integrating them with classroom experiences. Caring concerns within the democratic policy of the country.
- Make education relevant to the present and future needs.
- Softening the subject boundaries integrated knowledge and the joy of learning.
- The child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach.

The learner is encouraged to think, engage in activities, masters skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the total development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country India.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook SocietyÛ
Bengaluru, Karnataka

**Prof. G.S. Mudambadithaya**
Co-ordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook SocietyÛ
Bengaluru, Karnataka

# हितगुज

**मित्रहो,**

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनांप्रमाणे विशिष्ट टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करून वेळोवेळी विधायक बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन 1986 मध्ये 'नवे राष्ट्रीय धोरण' स्वीकारून शिक्षण पद्धतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. 1998 पासून संपूर्ण देशभर 'सामर्थ्याधारित शिक्षण' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला, आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करून देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनींनी स्वीकारली.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वतःच्या राहणीमान आचार विचारात बदल करत असतो. शिक्षणक्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नव विचार घेऊन पुढे जाणे, हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीय पातळीवर या नवविचारांचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुरक असेल अशी आशा मनी बाळगून 2005 मध्ये 'अभ्यासक्रमाची राष्ट्रीय चौकट' तयार करण्यात आली. एन.सी.इ.आर.टी. मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला 'एन.सी.एफ्.-2005' असे संबोधिण्यात आले आहे. एन.सी.एफ्.-2005 बाबत विस्ताराने शिक्षकमार्गदर्शिकेत माहिती दिलेली आहेच. तथापि या 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क 2005' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहोत असा ठाम विश्वास पाठ्यपुस्तक मंडळाला वाटतो.

सत्य आणि अहिंसेच्या तत्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारून 'चलेजाव' चा नारा द्यावा लागला;

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

स्वातंत्र्यासाठी ‘करो या मरो’ ही घोषणा द्यावी लागली.... म्हणजेच कणखर व्हावे लागले हे ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही.

‘एन.सी.एफ्-2005’ मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभावान भारताच्या उभारणीचे बिजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषतः समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय ‘भारतीय शिक्षणाने’ उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश ‘बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो’ या पूज्य साने गुरुजींच्या शब्दात सांगून पाठ्यपुस्तक मंडळ आपले ‘हितगुज’ पूर्ण करीत आहे.

या राष्ट्रीय ध्येयाप्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमीनागरिक, शिक्षक बंधू-भगिनी व पालक बंधू भगिनींच्या विधायक सुचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे. निर्देशनालयाच्या आदेशाप्रमाणे पुस्तक रचना समितीची यादी इंग्रजीमध्ये दिलेली आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीमध्ये श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल बेळगावचे मुख्याध्यापक श्री. एम्.के. मादार यांनी कार्यशाळांकरिता सभागृह आणि ग्रंथालय उपलब्ध करून दिले.

‘बाल भारती’ पुणे येथील मराठी विषयाचे विशेष अधिकारी प्रा. माधव राजगुरु यानी पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यात वेळोवेळी अमूल्य सल्ला दिला. लेखक व कवी यांची अनुमती मिळवून देण्याबाबत सहकार्य केले.

या पुस्तकातील एका पाठासाठी सुभाष फोटो स्टुडिओ, बेळगाव यांनी किल्ल्याचे फोटो उपलब्ध करून दिले.

पाठ्यपुस्तक मंडळ या सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

**पाठ्यपुस्तक मंडळ**

# TEXT BOOK COMMITTEE

**CHAIRMAN**

**Shri. Madhav Kunte,** Ushatai Gogte Girls' High School, Belagavi.

**MEMBERS**

**Shri. P.K. Muchandikar,** C.R.P. - Belgundi, Tal. & Dist. : Belagavi.

**Shri. R.G. Kulkarni,** Govt. Hr. Pry. Marathi School, Gunji Tal. : Khahapur, Dist. : Belagavi.

**Shri. S.D. Pakhare,** Govt. Hr. Pry. Marathi School, Kadoli, Tal. & Dist. : Belagavi.

**Shri. C.R. Mohite,** H.M. Govt. Hr. Pry. Marathi School, Sulaga (U), Tal. & Dist., Belagavi.

**ARTIST**

**Shri. V.B. Shinge,** Art Master, Karnataka High School, Dharwad.

**SCRUTINIZER**

**Dr. Amrut Yardi,** H.O.D. Marathi, Karnataka Arts College, Dharwad.

**CHIEF CO-ORDINATOR**

**Prof. G.S. Mudambadithaya,** Curriculum revision and text book preparation, KTBSLBengaluru.

**CHIEF ADVISERS**

**Sri. Narasimaiah,** Managing Director, KTBSLBengaluru.

**Sri. C. Nagamani,** Deputy Director, KTBSLBengaluru.

**PROGRAMME CO-ORDINATOR**

**Smt. M. Bhagyavathamma,** Assistant Director, KTBSLBengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

JA. ±. µiÈzÊU0q
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

(ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ)
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

**ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು**

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

**ಅಧ್ಯಕ್ಷರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

**ಸದಸ್ಯರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, G I ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ , ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್ ಎಸ್. ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

**ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:**

¼Ê JA. ±. µiÈzÊU0q, : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3

**ಶ್ರೀಮತಿ ಎಂ. ಡಿ. ಉಷಾ,** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3.

**ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:**

**ಎಲ್. ಶಂಕರೇಗೌಡ,** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–3.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

इयत्ता चौथी

# अनुक्रमणिका


| अ.नं. | पाठाचे नाव | | कवी/लेखक | पृ.सं. |
|---|---|---|---|---|
| 1. | भारत गौरव गीत | कविता | श्याम कुरळे | 01 |
| 2. | भारतमाता | | -- | 05 |
| 3. | दारोदारी एक झाड | | -- | 09 |
| 4. | स्वच्छता गीत | कविता | अनुसया व्यं. कुंभार | 16 |
| 5. | मी किल्ला बोलतोय | | -- | 20 |
| 6. | परोपकारी नरेंद्र | | संकलित | 26 |
| 7. | कधी वाटते | कविता | प्रवीण दवणे | 32 |
| 8. | खो-खो | | संकलित | 35 |
| 9. | फेसाटी सामना | कविता | वत्सला कर्णिक | 40 |
| 10. | अडाणी खेडूत | | संकलित | 43 |
| 11. | पत्रलेखन | | -- | 47 |
| 12. | बारा महिने | कविता | संकलित | 53 |
| 13. | खरा नायक | | -- | 57 |


R9D8J4

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 14. | शेतकरी गीत | कविता | सौ. प्रतिभा लेले | 65 |
| | 15. | साहसी शिरीष | | संकलित | 68 |
| | 16. | माझे गाव | कविता | कुसुमाग्रज | 73 |
| | 17. | शकुन अपशकुन | | -- | 76 |
| | 18. | संतवाणी | कविता | संत तुकाराम | 81 |
| | 19. | शब्द संग्रह | -- | -- | 85 |


@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

U9B3V1

## पाठ १

# भारत गौरव गीत

बहुत पाहिले देश जगी परि तुजसम तूच महान
तूच आमुची शान भारता! तूच आमुचा मान ।।धृ।।
विभिन्न धर्म, विभिन्न जाती
परि सर्वांची समान नाती
मानवतेचा विश्व वृक्ष हा, इथे वाढतो छान ।।१।।
हिमगिरीचा उन्नत माथा
पावन इथली गंगा माता
फळाफुलांचा देश आमुचा आम्हास हा अभिमान।।२।।
देश असे हा नरवीरांचा
लक्ष्मी, अहिल्या अन् पन्नांचा
देशासाठी नर, नारींनी इथे वेचिले प्राण ।।३।।
स्वातंत्र्यास्तव बापू लढले
परसत्तेचे निशाण पडले
नीलाकाशी फडकत राही आज तिरंगी निशाण ।।४।।
मिळेल जर का पुनर्जन्म तर
पुन्हा मिळावा याच भूमिवर
जननी जन्मभूमी तुजसाठी मरणाचे वरदान.

– श्याम कुरळे





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# स्वाध्याय

## ★ नवीन शब्दांचे अर्थ

गौरव – सन्मान
परि – प्रमाणे, सारखे
महान – मोठा
शान – मान
उन्नत – उच्च, श्रेष्ठ
माथा – डोंगराचे शिखर
वेचिले – अर्पण केले
वरदान – आशीर्वाद

## अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१) कवी कोणाचे गौरव गीत गात आहे?

२) भारताची पावन नदी कोणती?

३) आमचा देश कसा आहे?

४) महात्मा गांधीजींचे नाव या कवितेत काय म्हणून आले आहे?

५) कवीला मरण कोणासाठी हवे आहे?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## आ) खालील प्रश्नांची उत्तरे ३–४ वाक्यात लिही.

१) कवी भारताला मानवतेचा विश्ववृक्ष असे का म्हणतो?

२) देशासाठी कोणी प्राणांचे बलिदान दिले?

३) कवीला कशाबद्दल अभिमान आहे?

४) कवीने कोणती इच्छा व्यक्त केली आहे?

## इ) समानार्थी शब्द लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| १) विश्व | ................. | माया | ................. |
| २) वृक्ष | ................. | निशाण | ................. |
| ३) भूमी | ................. | जननी | ................. |

## ई) विरुद्ध अर्थी शब्द लिही.

१) महान x ................. अभिमान x .................

२) समान x ................. जन्म x .................

३) भिन्न x .................

## उ) जोड्या जुळव.

| अ | ब |
|---|---|
| १) मानवतेचा | अ) फडके तिरंगी निशाण |
| २) फळाफुलांचा | ब) वेचिले प्राण |
| ३) देशासाठी नरनारींनी | क) मरणाचे वरदान |
| ४) नीलाकाशी | ड) विश्ववृक्ष |
| ५) जन्मभूमी तुजसाठी | इ) देश आमुचा |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ए) कृती१

१) सुचविलेल्या धान्यांचा वापर करून तिरंगा ध्वज तयार कर.

**साहित्य :**

१) धान्य (मसूर डाळ, साबूदाणे, हिरवे मूग)

२) पांढरा कागद

३) फे विकॉल/डिंक

पांढरा कागद घेऊन तिरंगी ध्वजाचे चित्र काढ.

रेखांकित भाग गडद रंगाने रंगव व मधल्या भागात फे विकॉलच्या सहाय्याने योग्य धान्य चिकटव.

सुंदर तिरंगी ध्वज तयार होईल.

(टिप : अशा प्रकारे वेगवेगळ्या साहित्याचा वापर करून चित्र संग्रह तयार कर)

## ओ) अंक जोडून चित्र तयार कर. (भारताचा नकाशा)




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# पाठ २

# भारत माता

महाराष्ट्रातले पुणे हे शहर पूर्वीपासून ज्ञानाचे माहेरघर. विचारवंतांचे शहर, ऐतिहासिक महत्त्वाचे शहर. भारतात अनेक जुन्या चालीरीती, अंधश्रद्धा होत्या. त्यांचे निर्मूलन करून नवीन परंपरा निर्माण करणारे शहर म्हणून ओळखले जाते. याच जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. थोर समाजसुधारक महात्मा फुले, मुलींची पहिली शाळा प्रारंभ करणाऱ्या सावित्रीबाई फुले, देशाबद्दल प्रखर अभिमान व प्रेम असणारे लोकमान्य टिळक या सर्व थोर माणसांची पुणे हीच कर्मभूमी.

अशा या पुण्यनगरीत गजानन नावाचा मुलगा रहात होता. त्याच्या वडिलांची व लोकमान्य टिळकांची बरीच मैत्री होती. ते एकमेकांच्या घरी जात. त्यांच्यात भारतातील ज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षण इत्यादी गोष्टींवर चर्चा होत असत. गजानन लहान असला तरी तो त्यांच्या गप्पा आवडीने ऐके. त्याला टिळकांच्या विषयी प्रेम व अभिमान होता.

एके दिवशी गजाननची आई गजाननला म्हणाली, ''गजू ऊठ, देवाची पूजा कर.''गजानन म्हणाला, ''आई मला कंटाळा आलाय.'' आई म्हणाली, ''देवाची पूजा करण्यात, कसला रे कंटाळा.'' ''आई लोकमान्य टिळकसुद्धा देवाला मानतात. पण ते



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

देवपूजा करण्यात वेळ वाया घालवित नाहीत'' गजानन म्हणाला. ''अरे बाळा, तू आपली तुलना कोणाशी करतोस? ते कुठे आणि तू कुठे?'' आई म्हणाली. ''अगं आई मी माझी तुलना त्यांच्याशी करत नाही. फक्त ते देवपूजेत वेळ वाया घालवित नाहीत असं म्हणतोय "गजानन म्हणाला". आई म्हणाली, ''अरे लोकमान्य टिळक पूजा करतात की नाही ते तुला नीट माहीत नसेल.'' गजानन म्हणाला, ''मग आई आज अनायासे ते आपल्या घरी येणारच आहेत. तेव्हा मी त्यांनाच विचारून खात्री करून घेतो. पण रागावू नकोस मी आता देवपूजा करेन.''

सायंकाळी लोकमान्य टिळक गजाननच्या घरी आले. गजाननने त्यांना गूळ पाणी दिले. लोकमान्य टिळक आणि गजाननच्या बाबांच्या बऱ्याच गप्पा झाल्या. ते जायला निघणार इतक्यात गजानन तिथे आला व म्हणाला, ''काका! तुम्ही देवाची पूजा करता का?'' लोकमान्य म्हणाले, ''हो! अगदी रात्रंदिवस.'' ''काय म्हणता! रात्रंदिवस! आणि ती कोणत्या देवाची?'' गजाननने विचारले. दिवाणखान्यातील भारतमातेचा फोटो दाखवत लोकमान्य म्हणाले, ''या भारतमातेची पूजा करतो.''

**तात्पर्य :** देशसेवा हीच खरी ईश्वर सेवा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### ★ नवीन शब्दांचे अर्थ

गृहस्थ – व्यक्ती, माणूस दिवाणखाना – बैठकीची खोली

अनायासे – सहज उपलब्ध

### अ) वाच व लिही.

१) लोकमान्य – ....................

२) ओळख – ....................

३) कंटाळा – ....................

४) भारतमाता – .....................

५) देवपूजा – .....................

६) रात्रंदिवस – .....................

## आ) दिलेल्या नमुन्याप्रमाणे खालील जोडशब्द तयार कर.

नमुना : चहा–पाणी

१) आई – ........ २) विटी – ........ ३) टेबल – ........

४) नदी – ........ ५) पैसा – ........ ६) झाडे – ........

## इ) एका वाक्यात उत्तरे लिही.

१) आई कोणावर रागावली ?

२) गजाननला देवपूजेचा कंटाळा का आला ?

## ई) खालील प्रश्नांची उत्तरे १–२ वाक्यात लिही.

१) ज्ञानाचे माहेरघर कोणते ?

२) शिवाजी महाराजांचा जन्म कोठे झाला ?

३) मुलींची पहिली शाळा कोणी सुरू केली ?

४) लोकमान्य टिळकांची मैत्री कोणाशी होती ?

५) लोकमान्य टिळकांचे पूर्णनाव लिही.

६) गजाननच्या आईने गजाननला काय करायला सांगितले ?

७) लोकमान्य रात्रंदिवस कोणत्या देवाची पूजा करत ?

## उ) खालील प्रश्नांची उत्तरे २–३ वाक्यात लिही.

१) देवपूजेसाठी लागणाऱ्या साहित्यांची यादी तयार कर.

२) पुणे शहराचे वैशिष्ट्य लिही.

३) टिळक व गजाननचे वडील यांच्यामध्ये कोणत्या गोष्टींची चर्चा होत असे ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

### ऊ) खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते लिही.

१) ''गजू, ऊठ देवाची पूजा कर.''

२) ''अग आई, मी माझी तुलना त्यांच्याशी करत नाही.''

३) ''अरे, लो. टिळक पूजा करतात की नाही ते तुला नीट माहीत नसेल.''

४) ''काका, तुम्ही देवाची पूजा करता का?''

५) ''या भारतमातेची पूजा करतो.''

### ए) खालील चौकोनात योग्य अक्षरे भरून अर्थपूर्ण शब्द तयार कर.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ★ १. | कु | | | २. | कु | | |
| २. | | | ट | ४. | | | ट |
| ३. | | ड | – | ४. | | ड | |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## पाठ ३

# दारोदारी एक झाड

T2L9A6

वनमहोत्सवाच्या आदल्यादिवशी मुले प्रार्थनेला पटांगणात जमली होती. प्रार्थनेनंतर मुख्याध्यापकांनी दुसऱ्या दिवशी होणाऱ्या वनमहोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक मुलाने, मुलीने एकेक झाड आणावे अशी सूचना दिली.

दुसरे दिवशी सर्व मुले रोपे घेऊन आली. महादेवाच्या मनात मात्र वनमहोत्सव हाएकच शब्द घुमत होता. केव्हा एकदा वर्गशिक्षकांना विचारू असे झाले होते. सर वर्गात आले.

सर्व मुले : नमस्ते सर.

शिक्षक : नमस्ते. आज ७ जुलै. आज आपण वनमहोत्सव साजरा करूया. रोपं आणलीत का?

सर्व मुले : होय सर.

श्रीधर : मी आंब्याचे रोप आणले आहे.

शिक्षक : छान! आंब्याची गोड फळे खावयास मिळतातच. त्याबरोबर कच्च्या कैऱ्यांपासून लोणचे, पन्हे, चटणी व जाम तयार करता येतो.

महादेव : सर, त्याची फक्त फळेच उपयुक्त असतात का?

शिक्षक : नाही, त्याची पानेसुद्धा उपयुक्त आहेत. शुभप्रसंगी पानांचे तोरण बांधले जाते. त्या झाडांचे लाकूड इमारतींसाठी वापरले जाते.

मंजिरी : सर, मी तुळशीचे रोप आणले आहे.

गोविंद : ये वेडा-बाई! (सगळी मुले हसू लागतात.)

शिक्षक : अरे, हसता कसले? मंजिरीने आणलेले रोप लहान आहे म्हणून? पण ते अत्यंत उपयुक्त आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आशिष : इवलेसे रोप आणि उपयुक्त कसे सर?

शिक्षक : तुळस ही एक औषधी वनस्पती आहे. तिच्यामुळे भोवतालची हवा स्वच्छ आणि निरोगी राहते. तिच्याकडून प्राणवायूचा पुरवठा भरपूर होतो. तुळशीचे पान अथवा त्याचा रस प्याल्याने स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते.तसेच घट्ट झालेला कफ पातळ होण्यास मदत होते.

सायली : सर, आणखी औषधी गुण असलेल्या वनस्पती कोणकोणत्या?

शिक्षक : कडुनिंब, हळद, माका, इत्यादी पैकी कडुनिंब अत्यंत औषधी आहे.

राधा : पण सर, कडुनिंब तर कडू असतो. गुढी पाडव्याच्या दिवशी कडुनिंबाची पाने खाणे म्हणजे एक शिक्षाच.

शिक्षक : हे बघ राधा, कडुनिंबाची पाने खाणे म्हणजे शिक्षा नाही. उलट ते वरदान आहे. तो कडू असला तरी खूपच गुणकारी आहे. कडुनिंबाच्या झाडाचे पान, फूल, साल, खोड, काड्या, लिंबोळ्या सर्व काही औषधी आहे. यापासून रक्तशुद्धी होते. खरूज, गजकर्ण, नायटा यासारखे त्वचारोगही बरे होतात.

रवी : सर, याच्या काड्या दात घासण्यासाठी का वापरतात?

शिक्षक : कारण, त्या काड्यातील रस कडू आणि जंतूनाशक असल्याने दातातील कीड मरते.

जॉन : सर, सारीच झाडे उपयुक्त आहेत का हो?

शिक्षक : होय, सर्वच झाडे उपयुक्त आहेत. कारण झाडांमुळे हवा शुद्ध राहते. जमिनीची झीज कमी होते. शेतीला आवश्यक पाऊस यामुळेच पडतो. पर्यावरणाचा समतोल राखला जातो. यासाठीच तर आपण वनमहोत्सव साजरा करतो.

महादेव : सर, वनमहोत्सव म्हणजे काय?

(सकाळपासूनच महादेवाच्या मनात असलेली शंका त्याने विचारली.)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



शिक्षक : वनमहोत्सव म्हणजे वनाचा मोठा उत्सव. म्हणजेच झाडांचे महत्व ओळखून झाडे लावणे व ती जोपासणे होय.

फातिमा : सर, आपण वनमहोत्सव का साजरा करायचा हो?

शिक्षक : आपल्या देशात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे विकासासाठी प्रचंड प्रमाणात झाडं तोडली जात आहेत. म्हणूनच पावसाचे प्रमाण कमी होऊन, उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. याचा मानवी जीवनावर दुष्परिणाम होत आहे. हे सर्व टाळण्यासाठी आपण वनमहोत्सव साजरा करायचा असतो. या दिवशी जिथे मोकळी जागा असेल तिथे झाडे लावावीत.

मंजिरी : सर, मी मे महिन्याचा सुट्टीत बेंगळूरुला गेले होते.

शिक्षक : अरे व्वा! तिथे तुला काय नवीन आढळले?

मंजिरी : तिथे जिथे जिथे मोकळ्या जागा आहेत, तिथे तिथे छोटे का असेनात पण सुंदर बगीचे तयार केले आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

{e j H$ ... åhUZM ~J i écm ~{JÀ`mM eha åhUVmV. h eha _mR AgZgÕm `W àXfU H$_r Amh. åhUZ h eha XemV "JrZ {gQr' åhUZ Am i I c OmV.

_hmXd ... ga, AmVm g_Oc dZ_hmËgdmM _hËd!

Mcm a _mRçmZ åhUm.

""XmanXmar EH$ PmS, Jmdm Jmdr EH$ dZ,
XemM H$ê$ ZXZdZ''

## स्वाध्याय

### ★ नवीन शब्दांचे अर्थ

amn - chmZ amnQ
H$è`m - chmZ, H$ƒ {had Am~
nÝh - H$arM ga~V
ËdMmanJ - earamdarc H$mVSrcm hmUma anJ

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1) _c àmWZcm H$R O_cr?
2) dZ_hmËgd H$ìhm gmOam H$aVmV?
3) H$À`m H$è`mnmgZ H$mUV nXmW V`ma H$c OmVmV?
4) dZ_hmËgd åhUO H$m`?
5) nmdgmM à_mU H$_r H$m hmV Amh?
6) H$mUV eha "JrZ {gQr' åhUZ Am i I b OmV?

### आ) खालील प्रश्नांची उत्तरे ३-४ वाक्यात लिही.

1) V i er `m AmfYr dZñnVrmgZ H$mUV \$m`X hmVmV?
2) H$SqZ~mVrb AmfYr JU H$mUV?
3) n`mdaUmVrc gd PmS Cn`ºm$ H$er AmhV?
4) dZ_hmËgd H$m gmOam H$cm OmVm?
5) V cmdcë`m amnmMr {ZJm H$er am I erc V {chr.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## इ) खालील वाक्य कोणी कोणाला उद्देशून म्हटले आहे ते लिही.

१) "मी आंब्याचे रोप आणले आहे"

२) "ये वेडाबाई!"

३) "वनमहोत्सव म्हणजे वनाचा मोठा उत्सव"

४) "सर, सारीच झाडे उपयुक्त आहेत का हो?"

५) "सर, आणखी औषधी वनस्पती कोणकोणत्या?"

## ई) खालील वाक्य अर्थपूर्ण पद्धतीने लिही.

१) पानांचे तोरण / जाते / बांधले शुभप्रसंगी.

२) आहे / रोप / तुळशीचे / मी / आणले.

३) प्राणवायूचा / तुळशीच्या / पुरवठा / रोपामुळे / होतो / भरपूर.

४) उपयुक्त / सारीच / आहेत / झाडे.

५) हवा / राहते / शुद्ध / झाडामुळे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उ) जोड्या जुळव.




## ऊ) उदाहरणा प्रमाणे प्रत्येक शब्दातील अक्षरा पासून शक्य तेवढे नवीन शब्द तयार कर.

CXm. .. AemH$dZ -- emH$, dZ, Zd, AemH$, H$dZ.

1) Am_aU -

2) _hm^maV -

3) am I UXma -

4) {hadmJma -

5) OZOmJaU -

ए) भरपूर ताकत आणि सुदृढ शरीरासाठी तू काय काय खाशील, पिशील सांग.

1) _mS Amcc YmÝ`

2) Ja_gm_mg

3) AmBñH$s_

4) {nH$ccm Am~m

5) MmH$cQg

6) CKSçmdaM AÞ

7) {haì`m nmc^mÁ`m

8) XY

ऐ) कोणत्याही एका झाडाचे चित्र काढून रंग भर.

ओ) चित्रातील जंगलात औषधी वनस्पती आहेत. त्या शोधून लिही.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## ओ) चित्रातील जंगलात औषधी वनस्पती आहेत. त्या शोधून लिही.



१. ____________

२. ____________

३. ____________

४. ____________

## औ) नमुन्याप्रमाणे लिही.

| | | |
|---|---|---|
| उदा. | केळी | शिकरण |
| १) | .................... | लोणचे |
| २) | .................... | श्रीफळ |
| ३) | .................... | देवपूजा |
| ४) | .................... | त्वचा रोगावर गुणकारक |
| ५) | .................... | स्वच्छ निरोगी हवा |
| ६) | .................... | इमारत |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अं) तुमच्या परिसरात पिकणाऱ्या धान्यांची नावे व त्यांचे उपयोग लिही.

| | धान्य | उपयोग |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |

## पाठ ४

# स्वच्छता गीत

W2J4L3



स्वच्छ माझे घर । स्वच्छ आवार
स्वच्छ माझा गाव । ठेवीन मी ।।धृ।।

तुंबली गटारे । करीन मोकळी
नखे, केस स्वच्छ । ठेवीन मी ।।१।।

कचरा नि कागद । सर्वच रस्त्यावर
नाही फेकणार । नाही टाकणार ।।२।।

हात पाय तोंड । नेहमी धुवेन
आंघोळ नेमाची । रोज करेन ।।३।।

रस्त्यावर खाऊ । नाही घेणार
शिळे, आंबले, उघडे । नाही खाणार ।।४।।

काढेन केर । बिया, साले, टरफले
कचरा कुंडीतच । टाकीन सारे ।।५।।

**– अनुसया व्यं. कुंभार**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



# स्वाध्याय

## ★ नवीन शब्दांचे अर्थ

आवार – घरचे अंगण

तुंबणे – साचणे, जमून राहणे

## अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१) प्रत्येकाने आपले घर व गाव कसे ठेवावे?
२) तुंबलेल्या गटाराचे काय करणार आहे?
३) कागद कोठे फेकू नये?
४) बिया, साली, टरफले टाकण्याची जागा कोणती?

## आ) खालील प्रश्नांची उत्तरे ३–४ वाक्यात लिही.

१) आपण काय काय स्वच्छ ठेवणार आहोत?
२) सकाळी उठल्याबरोबर शरिराची स्वच्छता कशी करावी?
३) शिळे, आंबलेले, उघडे पदार्थ का खाऊ नयेत?
४) शाळा अथवा घरी कचरा कुंडीचा वापर कसा करावा?
५) तू घरात किंवा शाळेत स्वच्छता कशी ठेवशील?

## इ) खालील वाक्ये वाचून त्यांचे चांगल्या सवयी व वाईट सवयी यामध्ये वर्गीकरण कर.

१) आपले घर, आवार स्वच्छ ठेवावे.
२) तुंबलेली गटारे स्वच्छ करू नयेत.
३) नखे वाढू द्यावीत.
४) कचरा आणि कागद रस्त्यावर फेकू नये.
५) दररोज हात, पाय, तोंड धुवू नयेत.
६) दररोज आंघोळ करावी.
७) रस्त्यावरचे उघडे खाद्य पदार्थ खाऊ नयेत.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

८) शिळे, आंबलेले अन्न खावे.
९) बिया, साले, टरफले कचरा कुंडीतच टाकावी.
१०) स्वच्छ कपडे घालू नयेत

| चांगल्या सवयी | वाईट सवयी |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## ई) नमुन्याप्रमाणे जोड शब्द तयार कर.

उदा. पाला - पाचोळा

१) घर ............. २) केर .............
३) हात ............ ४) भाजी ...........
५) चहा ........... ६) खाणे ...........
७) वेणी ...........

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## उ) वाच व त्याप्रमाणे वाग.



### १) सकाळी उठल्यावर

☞ प्रथम शौचाला जावे.
☞ नंतर हात पाय स्वच्छ धुवावेत.
☞ स्वच्छ टॉवेलने हात पाय पुसावेत.



### २) दातांची स्वच्छता

☞ दात स्वच्छ घासावेत.
☞ चुळ भरून तोंड चांगले धुवावे.
☞ रात्री झोपण्यापूर्वी दात घासावेत.

## ३) डोळ्यांची स्वच्छता



- ☞ स्वच्छ पाण्याने डोळे हळू धुवावेत.
- ☞ डोळ्यात साचलेली घाण पाण्याने काढावी.
- ☞ डोळ्यात धूळ कचरा गेल्यावर चोळू नयेत. पाण्याने धुवावेत.

## ४) त्वचेची स्वच्छता



- ☞ रोज आंघोळ करावी.
- ☞ स्वच्छ टॉवेलने सर्व अंग नीट पुसावे.
- ☞ केस ओले ठेवू नयेत.
- ☞ बाहेरून आल्यावर नेहमी हातपाय व चेहरा स्वच्छ धुवावा.

## ५) नाकाची स्वच्छता

- ☞ नाक स्वच्छ ठेवण्यासाठी रूमाल वापरावा.
- ☞ शिंकताना नाकासमोर रूमाल धरावा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ६) नखांची स्वच्छता

- ☞ नखे वाढली तर त्यात घाण साचते. म्हणून आठवड्यातून एकदा नखे कापावीत.
- ☞ नखे कधीही कुरतडू नयेत.

## ७) केसांची स्वच्छता



- ☞ तोकडे केस रोज धुवावेत.
- ☞ लांब केस आठवड्यातून एकदा धुवावेत.
- ☞ केस रोज विंचरावेत.

## ८) स्वच्छ कपडे

- ☞ नेहमी स्वच्छ कपडे घालावेत.
- ☞ आपले कपडे नीट नेटके ठेवावेत.
- ☞ जवळ नेहमी स्वच्छ रूमाल बाळगावा.

## पाठ ५

# मी किल्ला बोलतोय

G6S2Q8

सहल म्हटलं की सर्वांनाच आनंद होतो. आमचे वर्गशिक्षक श्री राघव गुरुजींनी इयत्ता चौथीच्या वर्गाच्या सहलीचे आयोजन केले होते. सरांनी आम्हाला सहलीच्या नियोजनाची माहिती दिली.

मुलांनो! यावर्षी आपण बेळगावीचा भुईकोट किल्ला पाहायला जायचे ठरविले आहे. तेथे आपण किल्ला, दुर्गामाता मंदिर, रामकृष्ण मठ, पुरातन कमलबस्ती येथील शिल्पकलाकृती पाहायच्या आहेत. दुपारनंतर किल्ल्यासमोर असलेल्या तलावात जलविहाराचा आनंद लुटायचा आहे. होडीतून फेरी मारताना लाईफ जॅकेट परिधान करायला देतात. फार गंमत वाटते. छोट्या छोट्या बोटी, रंगीबेरंगी फुलझाडे, कारंजी असे लहान मुलांसाठी अनेक मनोरंजक खेळ आहेत. ते आपण खेळू शकता. सहलीसाठी येताना जेवणाचा डबा, वॉटर बॅग, वही, पेन, छोटासा टॉवेल सोबत घेऊन यायचं. आपण सर्वांनी सरकारी बसमधून प्रवास करायचा आहे.

सरांचे सांगणे ऐकून माझा आनंद गगनात मावेनासा झाला. घरी जाऊन मी वडिलांना सर्व हकिकत सांगितली. केव्हा एकदा मी किल्ला पाहीन याच विचारात झोपी गेलो. मी गाढ झोपेत होतो. प्रत्यक्ष किल्लाच माझ्यासमोर उभा होता. आणि तो बोलू लागला.



बाळ! मला भुईकोट किल्ला म्हणतात. बेळगावीच्या वेशीतच मी उभा आहे. माझा विस्तार सुमारे १०० एकर इतका आहे. माझी निर्मिती १३ व्या शतकात करण्यात आली. माझ्या क्षेत्रात, असणाऱ्या स्थळांची माहिती तुला सांगणार आहे. भव्य दगडी तट, सभोवती खोल खंदक असे माझे बाह्य रूप आहे. उत्तर व पश्चिम दिशेला दोन भव्य प्रवेशद्वारे आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

उत्तरेकडील मुख्य प्रवेशद्वारातून आत गेलास की सर्व प्रथम तुला दुर्गामातेचे मंदिर पाहावयास मिळेल. सकाळ संध्याकाळ येथे विधिपूर्वक पूजा करतात. पुढे जाऊन उजवीकडे वळलास की रामकृष्ण आश्रम आहे. पूर्वी येथे कौलारू घरे होती. आता भव्य इमारत दिसते. येथे स्वामी विवेकानंद १० दिवस राहिले होते. त्याची आठवण करून देणारे छोटेसे कौलारू घर तिथे आहे. मठात रामकृष्ण परमहंस, माता शारदादेवी यांच्या प्रतिमा आहेत. येथील वातावरण मन प्रसन्न करते.



त्याच्याच बाजूला दक्षिणेकडे पुरातन कमलबस्ती आहे. यामध्ये आपल्याला दगडातील सुंदर कोरीवकाम पाहावयास मिळते. १३ व्या शतकात रट्ट राजांनी याची निर्मिती केली. या बस्तीच्या गाभाऱ्यात नेमिनाथांची मूर्ती आहे. सभामंडपात अनेक प्राणी, फुले, वेली यांच्या सुंदर शिल्पकलाकृती आहेत. यामध्ये कमल पुष्पांच्या सुंदर नक्षी आहेत. म्हणून त्या बस्तीला कमल बस्ती असे म्हणतात.



KTBS NOT TO BE REPUBLISHED

माझ्या सभोवती ४० ते ५० फूट खोल खंदक आहे. शत्रूपासून रक्षण व्हावे म्हणून तो खोदला होता. त्याला पाहून शत्रूला पुढे येण्याची हिम्मत होत नव्हती. मी अगदी दिमाखात उभा होतो. पण आज ती स्थिती राहिली नाही. माझं वैभव



कमी कमी होत चालले आहे. कदंब, राष्ट्रकूट राजांपासून ते छत्रपती शिवाजी महाराज, इंग्रजांपर्यंत अनेकांनी माझ्यावर राज्य केले. त्यांच्या सत्तेच्या संघर्षात माझे हाल झाले. बऱ्याच ठिकाणी तटाला तडे गेले. बुरूज कोसळले आहेत. सभोवताली झाडे झुडपे वाढलेली आहेत. खंदकात सगळीकडे सामान्य माणसे केरकचरा टाकत आहेत. हे पाहून मला फार वाईट वाटते. या सर्व गोष्टींमुळे परिसराचे प्रदूषण होत आहे. त्यामुळे माझे ऐतिहासिक महत्त्व कमी होत आहे.

बाळांनो, तुम्ही या देशाचे भावी नागरिक म्हणून मी तुम्हाला सांगतो आहे. माझ्यासारख्या ऐतिहासिक स्थळांचे रक्षण करा. आमचे महत्व तुम्ही सर्वांना सांगावे, हीच माझी इच्छा.

मी सर्व किल्ला फिरून पाहिला. शेवटी बाहेर पडताना मागे वळून पाहिले. किल्ला माझ्याकडे पाहून हसत होता. बसच्या खिडकीतून मी हळूच किल्ल्याला टाटा करत होतो. एवढ्यात आईने माझा हात पकडून विचारले, बाळ, तू झोपेत कोणाला टाटा करत आहेस? तेव्हा मी जागा झालो आणि आईला सगळी हकिकत सांगितली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### ★ नवीन शब्दांचे अर्थ

शिल्पकलाकृती – दगडातील कोरीव काम
लाईफ जॅकेट – पाण्यात बुडू नये म्हणून घालायचा रबरी पोषाख (जॅकेट)
वॉटर बॅग – पाण्याची पिशवी
पुरातन – प्राचीन
हिम्मत – धाडस
खंदक – किल्ल्याच्या भोवतालचा चर

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१) राघव गुरूजींनी कशाचे नियोजन केले होते?
२) सहलीला कोठे जायचे ठरविले होते?
३) किल्ला कोणाशी बोलत होता?
४) किल्ल्यात कोणकोणती मंदिरे आहेत?
५) या किल्ल्यावर राज्य केलेल्या राजांची नावे कोणती?

## आ) खालील प्रश्नांची उत्तरे ३-४ वाक्यात लिही.

१) सहलीमध्ये किल्ला परिसरातील कोणकोणती स्थळे पाहायचे ठरविले होते?
२) सहलीला येताना कोणते साहित्य आणण्यास सांगितले होते?
३) कमलबस्तीविषयी माहिती लिही.
४) किल्ल्याच्या बाह्यरुपाचे वर्णन करा.
५) किल्ल्याने कोणती खंत व्यक्त केली?
६) ऐतिहासिक स्थळांचे रक्षण करण्यासाठी काय केले पाहिजे?

## इ) गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द भर.

(कमलबस्ती, भुईकोट, १३ व्या, प्रदूषण)
१) बेळगावी येथे ................ किल्ला आहे.
२) हा किल्ला .............. शतकात बांधण्यात आला.
३) बेळगावीच्या किल्ल्यात असणाऱ्या बस्तीला ............. म्हणतात.
४) ............. मुळे किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व कमी होत आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उ) या पाठात किल्ल्यासंबंधी आलेल्या शब्दांची यादी तयार कर.

| | | |
|---|---|---|
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |

## ऊ) तुम्हाला माहीत असलेल्या किल्ल्यांची नावे लिही.

| | | |
|---|---|---|
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |
| .................... | .................... | .................... |

**ए)खाली दिलेल्या चित्रातील अक्षरामध्ये पाठातील १६ शब्द दडले आहेत. त्यातील योग्य अक्षरांची निवड करून अर्थपूर्ण शब्द तयार कर.**




उदा. जलविहार

| | | | |
|---|---|---|---|
| १) ........... | ५) ........... | ९) ........... | १३) ........... |
| २) ........... | ६) ........... | १०) ........... | १४) ........... |
| ३) ........... | ७) ........... | ११) ........... | १५) ........... |
| ४) ........... | ८) ........... | १२) ........... | १६) ........... |

**ऐ) शिक्षकांच्या मदतीने तुमच्या परिसरातील किल्ल्यांची माहिती १५-२० ओळीत लिही.**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 'त' काराची गमंत



तनुजा आणि तुषार यांनी केलेला हा दिवाळीतील किल्ला पहा. त्यामध्ये 'त' या अक्षरापासून सुरु होणाऱ्या किती वस्तू तुम्हाला दिसतात बरं ?

J5X9W7

## पाठ ६

# परोपकारी नरेंद्र



स्वामी विवेकानंद या थोर पुरुषाचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव भुवनेश्वरी देवी व वडिलांचे नाव विश्वनाथबाबू दत्त असे होते. विवेकानंदांचे लहानपणीचे नाव नरेंद्र होते. त्यांच्या आयुष्यात घडलेला हा एक प्रसंग.

नरेंद्र आणि त्याचे मित्र दररोज एका मोठ्या व्यायामशाळेत जात असत. जोर, कुस्ती, बैठका, म लखांब, वजन उचलणे, साखळ्यांना धरून लोंबकळणे असे व्यायाम ते सर्वजण करीत असत. चांगल्या शिक्षकांनाही तिथे बोलावून त्यांच्या कडून व्यायामाचे अनेक प्रकार शिकविले जात. हे व्यायामाचे प्रकार पाहण्यासाठी बरेच लोक गर्दी करत असत.

एकदा एक नामवंत व्यायामपटू तिथे आला होता. नरेंद्र, त्याचे मित्र आणि प्रेक्षकांनीही गर्दी केली होती. तो व्यायामपटू कौशल्याने वेगवेगळे व्यायाम प्रकार सहज करून दाखवीत होता. लोक टाळ्या वाजवून त्याचा उत्साह वाढवीत होते.

अचानक कडाड्कड असा आवाज झाला. लोंबकळणारी साखळी कड्यापासून तुटून एका माणसाच्या डोक्यावर आदळली. त्या आघाताने तो माणूस बेशुद्ध होऊन पडला. डोक्याला मोठी जखम झाली.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्यातून भळाभळा रक्त वाहू लागले. ते पाहताच व्यवस्थापक, व्यायामपटू यानी पळ काढला. प्रेक्षकसुद्धा घाबरले होते. नुसते हळहळत तेथून काढता पाय घेत होते.



नरेंद्र धावतच त्या माणसा जवळ गेला. त्याने आपल्या मित्रांना बोलावले. व्यायाम शाळेतील कापूस व पट्टी शोधून काढली. त्या माणसाची जखम स्वच्छ करून त्याला पट्टी बांधली. जखम मोठी होती. त्यामुळे नरेंद्रने घोडागाडीत घालून त्या माणसाला दवाखान्यात नेले. वैद्याकडून उपचार झाल्यामुळे तो माणूस शुद्धीवर आला. तोपर्यंत नरेंद्र व त्याचे मित्र त्या माणसाजवळ बसून होते. शुद्धीवर येताच नरेंद्राने त्याचे नाव गाव विचारले. त्याचे नाव देबूदा होते. तो एक नाविक होता. गंगेमध्ये नाव चालवून आणि मासेमारी करून तो आपला संसार चालवीत होता. त्याला बायको व तीन मुले होती.



त्याची गरिबीची परिस्थिती ओळखून नरेंद्र व त्याच्या मित्रांनी वर्गणी गोळा केली. औषधाचा खर्च करून उरलेले पैसे त्याच्या हाती देत नरेंद्र म्हणाला, ''देबूदा, हे पैसे ठेवा तुमच्याकडे. फारच कमी आहेत हे, पण दोन तीन दिवसांच्या मलमपट्टीसाठी तुमच्या कामी येतील.''देबूदा गहिवरून नरेंद्रला जवळ घेत म्हणाले, ''बाळ, एवढ्या लहान वयातही तुझं मन केवढं मोठं आहे रे!''

मुलांनो! ज्यांना आज आपण स्वामी विवेकानंद या नावाने ओळखतो तोच हा लहानपणीचा नरेंद्र बरे!

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# स्वाध्याय

## ★ नवीन शब्दांचे अर्थ

आघात – धक्का, प्रहार

हळहळणे – खेद किंवा शोक करणे

गहिवरणे – कंठ दाटून येणे, मन भरून येणे

## ★ खालील वाक्प्रचारांचा अर्थ समजून घे.

१) काढता पाय घेणे – निघून जाणे.

२) मलमपट्टी करणे – जखमेवर औषधोपचार करणे.

३) कौशल्य दाखविणे – हुशारी दाखविणे.

४) हळहळणे – दु:ख व्यक्त करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१) व्यायामशाळेत कोणकोणते व्यायामप्रकार केले जात असत?

२) साखळी कोणाच्या डोक्यावर आदळली?

३) व्यवस्थापक व व्यायामपटूंनी काय केले?

४) देबूदाला दवाखान्यात कोण घेऊन गेले?

५) विवेकानंद यांनी जगाला कोणती शिकवण दिली?

## आ) खालील प्रश्नांची दोन–तीन वाक्यात उत्तरे लिही.

१) देबूदा कसा जखमी झाला?

२) नरेंद्रने देबूदाला कशी मदत केली?

३) देबूदाच्या कुटुंबाविषयी माहिती लिही.

४) समज! नरेंद्रच्या ठिकाणी तू असतास तर काय केले असतेस?

## इ) खालील रिकाम्या जागा भर.

१) नरेंद्र आणि त्याचे मित्र दररोज ........... येथे जात असत.

२) लोंबकळणारी साखळी .......... च्या डोक्यावर आदळली.

३) नरेंद्रने देबूदाची ............. स्वच्छ केली.

४) देबूदा हा एक .............. होता.

५) नरेंद्र हाच पुढे .......... या नावाने ओळखला जाऊ लागला.

## ई) नमुन्याप्रमाणे कंसातील योग्य शब्द रिकाम्या जागी भर.

(परावलंबी, परममित्र, पाहुणचार, परदेशी)

उदा. दुसऱ्याला मदत करणारा – परोपकारी

१) घरी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करणे .............

२) दुसऱ्या देशातील व्यक्ती ...........

३) दुसऱ्यावर अवलंबून असणारा ..........

४) खास जिवलग मित्र .............

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

उ) तू खेळत असलेल्या खेळांची नावे गोलात लिही.



ऊ) तू यांना कोणत्या प्रकारे मदत करशील ते लिही.

| व्यक्ती | मदतीचा प्रकार |
|---|---|
| आई | ........................................ |
| वडील | ........................................ |
| बहीण | ........................................ |
| आजी आजोबा | ........................................ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ए) कन् हा प्रत्यय लावून पुढील शब्द पूर्ण कर.

उदा. धप्कन्

| | |
|---|---|
| १) चट् ............. | ६) खाड् .............. |
| २) मट् ............. | ७) धाड् ............. |
| ३) टप् ............. | ८) फाड् ............. |
| ४) तट् ............ | ९) काड् ............. |
| ५) गप् ............ | १०) ताड् ............. |

## ऐ) या व्यक्तींच्या स्वभाव विशेषांच्या जोड्या जुळव.

| | |
|---|---|
| १) कुंभकर्ण | खादाड |
| २) नारद | दानशूर |
| ३) बकासूर | भोळा |
| ४) कर्ण | झोपाळू |
| ५) हनुमान | कळलाव्या |
| ६) शंकर | बलवान |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

S8L3E4

## पाठ ७

# कधी वाटते



कधी वाटते रोजचेच हे
रूप नाहीसे व्हावे
हिरव्या हिरव्या वनराईतुन
स्वैर मुक्त हिंडावे ।।धृ।।

होऊन हुप् हुप् माकड
घ्यावा उंच झोका
मित्रांना मग छळण्याचा
येईल हाती मोका
रोज सकाळी संध्याकाळी
हिरवे पेरू खावे ।।१।।

होऊनी मुंगी बारीक
दुकानात मी जाईन
भरणीमधले पेढे बर्फी
फस्त करून मी येईन
सापडलो जर केव्हा हाती
घेईन अनेक चावे ।।२।।

कधी होऊनी मोर भर्जरी
फुलवीन रंग पिसारा
खुशाल नाचीन अंगणातुनी
झेलीन पाऊसधारा
आकाशातील शतरंगाचे
पाहीन मी देखावे ।।३।।



– प्रवीण दवणे

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

# स्वाध्याय

## ★ नवीन शब्दांचे अर्थ

स्वैर - स्वच्छंदी, मुक्तपणे मोका - संधी
फस्त - खाऊन संपविणे भर्जरी - भरजरी (जरीने भरलेला)
शतरंग - शेकडो रंग

## अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१) कवीला हिरव्या वनराईतून कसे फिरावेसे वाटते?
२) माकड झाल्यावर कोणत्या गोष्टी करण्याचा मोका आपल्याला मिळतो?
३) माकड झाले की सकाळी संध्याकाळी काय खाता येईल अशी तो कल्पना करतो?
४) मुंगी झालो तर कोणती चैन करता येईल असे कवीस वाटते?
५) हाती सापडलीतर मुंगी काय करते?
६) मोर केव्हा नाचतो?
७) मोर होऊन कसले देखावे पहावेत असे कवीला वाटते?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ब) खालील प्रश्नांची उत्तरे ३-४ वाक्यात लिही.

१) माकड व्हावे असे कवीला का वाटते?
२) मुंगी होऊन त्याला काय करायचे आहे?
३) मोर झालो तर आपल्याला कसे वागता येईल?
४) जर तू हत्ती झालास तर काय करशील?

## क) अनेक वचन लिही.

झोका .................... चावा ....................
मोका .................... पिसारा ....................
पेढा .................... देखावा ....................

## ड) शिक्षकाच्या सहाय्याने चर्चा कर.

१) पेरू खेरीज माकड आणखी काय काय खाते?

२) मुंगीचा कोणता गुणधर्म आपण घेण्यासारखा आहे?

३) आकाशातील शतरंगांचे देखावे असे कवी का म्हणत असेल?

४) अशी विविध रूपे आपण घ्यावीत असे कवीला का वाटत असेल?

## इ) कवितेच्या ओळी पूर्ण कर.

१) होऊन ................ माकड

......................... झोका

...............................

......................... मोका

२) कधी होऊनी मोर ................

..................................

..................................

.................... पाऊस धारा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## ई) कवितेचा दिलेला भावार्थ वाचून त्याला अनुसरून असलेल्या वरील कवितेतील ओळी लिही.

१) मला कधीकधी वाटते की आपले नेहमीचे रूप नाहीसे व्हावे आणि हिरव्या वनराईतून मुक्तपणे हिंडावे.

२) मला कधी कधी वाटते की दुकानात जाऊन भरणीतील पेढे बर्फी खावे व मी जर कोणाच्या हाती सापडलो तर त्याला चावावे.

## पाठ ८

# खो-खो

A2Q7B2

खो-खो हा एक भारतीय खेळ आहे. हा खेळ खर्चिक नाही. कोणत्याही साहित्याशिवाय हा खेळ खेळला जातो. यामध्ये प्रत्येक गटात प्रत्यक्ष खेळणारे नऊ व राखीव तीन खेळाडू असतात.

क्रीडांगण पंचवीस मीटर लांब व चौदा मीटर रूंद असे आयताकार असते. यामध्ये दोन बाजूला दोन पोल (खांब) असतात.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

या पोलांच्या दरम्यान खेळाडूंना बसण्याच्या जागा दाखविणाऱ्या आठ चौकटी आखलेल्या असतात. प्रत्येक चौकटीच्या दोन्ही बाजूंना मैदानाचा आडव्या सीमारेषेपर्यंत दोन-दोन रेषा आखलेल्या असतात.

**खेळाची पद्धत :** आक्रमक संघाचे (चेजर्स) आठ खेळाडू वरील आठ चौकटीवर उकिडवे बसतात. त्यांची तोंडे एकमेकांच्या विरुद्ध दिशेला असतात. नववा खेळाडू पाठलाग करणारा खेळाडू म्हणून एका पोलजवळ उभा राहतो.

बचाव संघाचे (रनर्स) तीन खेळाडू एका वेळी एकाच ठिकाणाहून मैदानात प्रवेश करतात. (ते तिघे बाद होईपर्यंत पुढच्या खेळाडूना क्रीडांगणात प्रवेश नसतो.)

